# आण्णा भाऊ आजरा तालुका शेतकरी सह. सूत गिरणी मर्या; आजरा.

मुक्काम-खेडे, पोष्ट-मडिलगे, ता. आजरा, जि. कोल्हापूर

# ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## नोटीस

**(फक्त सभासदांकरीता)**

आण्णा भाऊ आजरा तालुका शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या; आजरा. या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या **मौजे खेडे येथील मिलसाईटवर बुधवार, दिनांक ०४/०९/२०२४ रोजी दुपारी ठिक ११.०० वाजता** खालील कामकाजासाठी बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी, सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

ठिकाण : मौजे खेडे, ता. आजरा
दिनांक : १९/ ०८ /२०२४

आपला,
आण्णा भाऊ आजरा तालुका शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या; आजरा करीता,

जनरल मॅनेजर
(संचालक मंडळाच्या अधिकाराने)

## ✲ सभेपुढील विषय ✲

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा व उत्पादन पत्रक यांची नोंद घेऊन मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने पुढील आर्थिक वर्षाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
४. सन २०२३-२०२४ या वर्षाचा लेखापरिक्षण व दोषदुरुस्ती अहवाल वाचून मंजूर करणे.
५. सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक व सल्लागार यांची नियुक्ती करणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

## ✲ सुचना ✲

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झालेस ही सभा एक तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी घेतली जाईल, त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही.
२. आर्थिक पत्रकांची प्रत संस्थेची वेबसाईट www.ajaraspin.org वर उपलब्ध आहे. तसेच ज्या सभासदांना आर्थिक पत्रके पहावयाची आहेत, त्यांना मिल साईटवर कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
३. ज्या सभासदांना कामकाजाबाबत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २९/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत संस्थेकडे पोहोचतील अशा रितीने लेखी पाठवावेत.
४. संस्थेच्या ज्या सभासदांची अद्याप वारस नोंद करावयाची आहे, तसेच पत्रव्यवहाराचे पत्ते बदलले अथवा अपुरे आहेत तसेच केवायसी (KYC) कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी संस्थेशी संपर्क साधून पुर्तता करुन घ्यावी.
५. मंजूर उपविधीप्रमाणे उर्वरीत भागाची रक्कम भरून सभासदांनी सहकार्य करावे.

**विशेष सुचना : सभासदांना सूतगिरणी साईटवर सभेकरीता येणे-जाणेसाठी वाहनाची व्यवस्था आजरा अर्बन बँक, आजरा येथून सकाळी ९.३० वाजलेपासून करणेत आली आहे.**